Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 3 | November – 2016

' गोंड ' आदिवासी जमातीची संस्कृती.

प्रा. नवनाथ पाटोळे
शरदचंद्र पवार कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोलापूर .

प्रस्तावना:-

भारतात अनेक आदिवासी जमाती मोठया संख्येने राहतात. या आदिवासी जमातीपैकी गोंड ही मोठया संख्येने राहणारी आदिवासी जमात आहे. महाराष्ट्रामध्ये गोंडाची वस्ती प्रामुख्याने विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर , भंडारा , गोंदिया आणि तुरळक नांदेड, अमरावती व वर्धा जिल्हयात आढळून येते. यापैकी गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हयात जास्त प्रमाणात आढळते. गोंडांच्या स्थलांतराविषयी वेगवेगळे तर्क अभ्यासकांनी मांडले आहेत. परंतू मानवशास्त्र व वंशशास्त्रीयदृष्टया गोंड द्रविडवंशीय असून विदर्भात बोलल्या जाणा-या गोंडी भाषेचे साधर्म्य तामिळ व तेलुगू भाषेशी आहे. माडीया-गोंड भाषेत कांही कन्नड शब्दही आढळतात. आर. व्ही. रसेल व हिरालाल यांच्या मते गोंड व खोंड या दोन्ही जमातीचे मुळ दक्षिण भारतातील आहे. नंतर त्यांनी उत्तर भारताकडे स्थलांतर केले आहे व ते नंतर मध्य प्रांत व ओरिसा पर्यंत गेले असावे असे म्हटले आहे.

गोंडाच्या राजगोंड, धुर्वे किंवा नाईक गोंड, खेतोले किंवा खातुलवार गोंड, माडिया गोंड या पोटजाती आहेत. अभिजात संस्कृतीची जोपासना करणा-या गोंडांना कोई / कोयी किंवा 'कोईतूर' असे म्हणतात. अशी गोंड जमात अजूनही आपल्या प्रथा, परंपरा, रिती-रिवाज, संस्कृतीची जपणूक करतात. त्यांच्या संस्कृतीची ओळख आपल्याला पुढील मुद्दयांच्या आधारे करुन घेता येईल.

घोटुल :-

' घोटूल ' हे माडिया गोंडांचे युवागृह आहे. आजही बस्तर विभागात घोटुल अस्तित्वात आहे. यालच गोटूल असे म्हणतात. गावाच्या मध्यभागी एक मोठी झोपडी असून प्राचीन रीती-रिवाजा प्रमाणे तीला झाडपाल्याने शेकारलेले असते. लाकडी फाट्याच्या भिंती असून त्यात प्रवेश करण्यासाठी एक प्रवेशद्वार असते. मध्यभागी एक लाकडी भिंत असून आतून त्याचे दोन भागात विभाजन केलेले असते. घोटुलला मोठे अंगण असून त्याच्या एका कोप-यात एक मोठा चपट दगड असतो. त्यांच्याजवळ एका दगडी हौदासारख्या साठवणीत पाणी साठवलेले असते. त्या पाण्याचा वापर हातपाय धुण्यासाठी केला जातो.

घोटुलमध्ये सायंकाळी त्या गावातील तरुण-तरुणी एकत्र जमतात. परंतू यात विवाहित स्त्रीयांना प्रवेश करता येत नाही. ते तरुण-तरुणी गातात, नाचतात व रात्री घरी जातात. घोटुलमध्ये मुला-मुलींना झोपण्याची व परस्परांशी शारिरीक सबंध ठेवण्यास परवानगी असते. परंतू सध्या ही पध्दती अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही. घोटुल मध्ये तरुण-तरुणींचा एकमेकाशी परिचय झाला की, त्यातून जोडया ठरवून लग्नही केले जात. गोंडामध्ये स्त्री-पुरुष सबंधांकडे उदार दृष्टिने पाहण्यात येते. मात्र गर्भावस्था प्राप्त झाल्यास त्या मुलाला मुलीशी विवाह करावाच लागतो. रात्रीपर्यंत मुला-मुलींची नाचगाणी चालतात यांना ' घोटुल पाटा ' असे म्हणतात. यात मुले-मुली शृंगार करुन येतात त्याचप्रमाणे गोंडांच्या संस्कृती, परंपरा याची माहितीही सांगितली जाते. गोंडामध्ये विवाहासाठी एक देवगटात येणा-या पाडींमध्ये विवाह होत नाही. एखादा मुलगा किंवा मुलगी नजरेत भरल्यास पाडी विचारली जाते जर या दोघांची पाडी एक असेल तर लगेच ते परस्परांना बहिण-भाऊ समजतात. एवढी अतिमागास गोंड समाज असूनही त्यांच्यातील मुला-मुलींच्या मानसिकतेचे कौतुकच केले पाहिजे. हेच त्यांच्या अभिजात संस्कृतीचे विशेषही म्हणतात येईल. घोटूलची व्याख्या सांगताना देवगांवकर म्हणतात, " गोंड संस्कृतीचे जतन, संवर्धन, मौखिक हस्तांतरण नवीन पिढीला करण्याचे तसेच मुला-मुलींमध्ये निकोप सबंध, लैंगिक शिक्षण आणि त्यातून जोडपी/ कुटूंब निर्माण करणारी संस्था म्हणजे घोटुल होय "

एकूणच घोटुलद्वारे गोंडांनी आपल्या संस्कृतीचे जतन केल्याचे दिसून येते. घोटुलामध्ये मुला-मुलींना सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षणाबरोबरच लैंगिक शिक्षणही दिले जाते. घोटुलाद्वारे त्यांना आपल्या आयुष्याचा जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाल्याचे दिसून येते.

गोंडांचे गोत्र -

गोंडाच्या सर्व पोटजाती एक सारख्याच आढळतात. गोत्र हे देवगटावर आधारलेले असतात. चार - देव, पाच - देव, सहा - देव, सात - देव आणि बारा - देव असे गोत्र गट असतात. प्रत्येक गोत्र गटात विशिष्ट कुळांचा अंतर्भाव होतो. ते सर्व एकमेकांना ' सगा ' म्हणतात. एकाच गोत्रात विवाह न होता दुस-या गोत्रात विवाह करण्याची परंपरा गोंडामध्ये आहे. म्हणजेच गोंड सगोत्री विवाह निषिध्द मानतात. प्रत्येक देवगटातल्या देवतांची नावे वेगवेगळी असून आराध्य पशु, पक्षीही असतात. त्याचप्रमाणे पताका व 'मूंड' (झाड) ही असते. उदा. पाच देव गटात अहेराहूड, माहेराहूड, रेकारा हूड, श्रीमालराहूड, आणि दोंदल्या राहूड हे देव, पानोल (राम-लक्ष्मण पक्षी) हा अवतार, पांढरी पताका आणि सालई किंवा मोहाचा मूंड असतो. लिंगाल पेन म्हणजे लिंगी देवाने ही समाजरचना दिली अशी श्रध्दा गोंडांमध्ये आहे. गोंडाचे सामाजिक संघटनही गोत्र समुच्चयाच्या आधारे करण्यात आले .

त्यांच्यांत उंदोर, चिंदोर, कांदोर हे कनिष्ठ व नालवेन (चार देवे) सायवेन (पाच देवे) , सारवेन (सहा देवे), येरवेन (सात देवे), जंगवेन किंवा तोरे (बारा देवे), हे श्रेष्ठ गोत्र-गट मानले जातात. यांनाच मानवशास्त्रात कुलगट असे म्हणतात. प्रत्येक गटाला संलग्न असा एक वंश असतो. त्यालाच ' सगा ' असे म्हणतात. प्रत्येक वंशाला वाचविणारा एक अवतार असतो. तो एखादा प्राणी असतो. त्या प्राण्याला गोंडांच्या संस्कृतीमध्ये महत्वाचे स्थान आहे. त्या प्राण्याला ते पवित्र मानतात. म्हणून याला कुलगट किंवा वंशांना कुलचिन्हात्मक वंश असे म्हणतात.

गोंडांची दैवते :-

गोंडाचे आराध्य दैवत पेरसापेन असून यालाच बडा-देव किंवा मध्यप्रदेशात भेरापेन म्हणतात. याचाच उल्लेख बुढालपेन , दुल्हादेव, महादेव, मोठा देव , शिव म्हणूनही केला जातो. आराध्य देवतांमध्ये महांकाली, कंकाली, कालीमाता, गिरीजा, पार्वती या महत्वाच्या देवता आहेत. कुपारलिंगो गोंडांचे महत्वाचे दैवत आहे. कुपारलिंगो यालाच पहाडी, पारी लिंगो असे म्हणतात. बडादेवाचा भक्त व गोंड जमातीला पर्वतांच्या गुहेतून मुक्ती देणारा व समाज संघटन करणारा मसीहा म्हणून याचा उल्लेख पुराणकथात येतो. त्याच्या कपाळावर लिंग असल्याने त्याला ' लिंगो ' हे नाव पडले आहे. लिंगोची जंगोदेवी ही बहीण त्याच्या बरोबर आली. यांनीच देवगट पाडले व गोंडांना संगीत व नृत्य शिकविले अशी कथा असल्याचे दिसते. गोंड लोक लिंगो आणि जंगोदेवीची पूजा करतात. गोंदिया जिल्हयातील सालेकसा तालुक्यातील चाँद सूरजच्या डोंगरात कचारगडाच्या डोंगरावर गोंडांचे आराध्य दैवत असलेल्या जंगो लिंगो, कुपारलिंगो यांची देवस्थाने आढळतात. तसेच सालईच्या झाडावर पेरसापेनचे वास्तव्य आहे. अशी त्यांची श्रध्दा आहे. याशिवाय कंकाली, महाकाली, बुढाळ-पेन , कुवारा - भिवसेन तसेच स्थानिक देवता - त्यात माता, मरीआई, ताडोबा, वाघोवा, इ. ची पूजा करण्याची परंपरा गोंडांमध्ये आहे. धर्मविधीसाठी भगत, पुजारी व पेरमा यासारखे पुजारी असतात. देवदेवतांना आवाहन करणे, दुष्टशक्ती निवारण, जादूटोणा तसेच वनऔषधी देण्याचे कार्य पेरमा, पुजारी, भगत करतात. हे सर्व दैवतांचे विधी करतांना बकरा किंवा कोंबडयाचा बळी देण्याची व दारु देण्याची प्रथा आहे.

गोंडाचे सण आणि उत्सव :-

गोंड समाज हा सण व उत्सव प्रिय आहे. गोंड लोकांचा हिंदू संस्कृतीशी अनेक वर्षापासून सबंध आल्याने त्यांनी हिंदू संस्कृतीतून बरेच सण स्विकारले आहेत. उदा. हिंदूप्रमाणेच गोंड दसरा, दिवाळी, होळी इ. सण साजरे करतात. या सणांबरोबरच ते आपले आदिम सणही साजरे करतात. माडिया गोंडामध्ये सणाला ' पंडुम' म्हणतात. गोंडामध्ये चार पंडुम महत्वाचे आहेत. पहिला पाऊस पडल्यावर ते ' पिनु पंडुम ' हा सण साजरा करतात. बियांची पेरणी करण्याच्या सणाला ' बिन्ना पंडुम ' म्हणतात. यालाच इरपा पंडुम असेही म्हणतात. पिंडी पंडुम म्हणजे नवीन धान्याचे (तांदळाचे) पीठ दळण्याचा सण. या सणाला पशुधनाची पुजा करण्याची प्रथाही त्यांच्यात आढळते. रानातील आलेले नवीन अन्न खाण्यासाठी गोंडांत सण करण्याचा रिवाज आहे. ते जेंव्हा नवीन अन्न खाण्यास सुरुवात करतात त्याला पोलवा म्हणतात. कुरुम पंडुम हा असाच ' पोलवा ' असतो. अशाप्रकारे गोंडामध्ये चार पंडुम साजरे करण्याचा रिवाज आहे. मोहाच्या फुलापासून गोंड दारु ' इरपा - इंडुम ' सणाला काढतात व पितात यालाच ' दारु ओवाळणे ' असे म्हणतात. ही दारु पहिल्यांदा देवाला अर्पण केली जाते. त्या दारुचा देवाने स्विकार करावा म्हणून ' भीवसेन किंवा भीमल देव ' या देवापुढे तीन द्रोणांमध्ये ठेवून प्रार्थना करतात. त्यातील थोडी दारु देवाला देतात. त्यानंतर नवरा आपल्या बायकोच्या खांद्याला , गुडघ्याला व कपाळाला दारुचे बोट लावतो व बायकोही नव-याच्या पायाला, गुडघ्याला, खांद्याला कपाळाला दारुची बोटे लावते. यालाच ' दारु ओवाळणे ' म्हणतात. या वेळेस घरच्या पाहुण्यांना एकत्र बोलावून प्रसाद वाटण्यात येतो. मग हे सगळे मिळवून दारु पितात.

धानाचे चरण संपले की, बिज्जा पण्डुम साजरा करण्यासाठी गोंड लोक एकत्र जमतात. पेरम्याला विचारुन एक दिवस ठरवितात. मग ते धानाला ' कोड ' पाडतात. धान एका तबकडीत माती घेऊन त्यात पेरतात. कोवळया अंकुरांना उगवू देतात. त्याला कोड पाडणे म्हणतात एकूणच गोंड ही आदिवासी मागास जमात असली तरी त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. कोड पाडण्यावरुन ती माती पेरण्यायोग्य असेल तर ' पेरमा ' सण साजरा करतात.

गोंड लोक बिज्जा पंडुम सणाच्या वेळी कोंबडीचे पिल्लू किंवा बोकड कापतात. नंतर त्या धानाच्या कोडाच्या टोपल्या घेऊन तळयाजवळ जातात. थेनाच्या झाडाच्या पानावर टोळीचे तेल घालून विस्तवाजवळ ठेवतात. ते शिजायला ठेऊन दुसरीकडे पूजेला सुरुवात करतात. पूजेमध्ये ते ' कनयाम ' ' कनयाम ' ' भूताम ' देवाला तांदूळ अर्पण करतात, नंतर कोंबडीच्या पिलाला विस्तवाजवळ आणून ते तांदूळ खायला देतात. आणि त्याला या देवाला अर्पण करतात. वृक्षाच्या छायेत देवाची पूजा करुन पहिल्यांदा त्याचा नैवेद्य देवाला दाखवून सर्वजण जेवतात. अशा प्रकारे गोंडामध्ये सण/ उत्सव साजरा करण्यासाठी प्रथा आहे.

गोंडाचे विधी :-

बाळाचा जन्म झाल्यानंतर म्हणजेच बाळ पडल्यानंतर ५ व्या किंवा ९ व्या दिवशी नाव ठेवण्याचा कार्यक्रम करतात. बाळाचे नाव ठेवताना तांदळाची एक परचुंडी दो-याने बांधून त्याच्या समोर हलवित ठेवतात. बाळ त्या परचुंडीला पकडण्याचा प्रयत्न करते. त्यावेळी त्याच्या पुढे वेगवेगळी नावे घेतली जातात. बाळाने हाताने पकडल्यानंतर ज्या नावाचा उच्चार झाला आहे ते नाव ठेवले जाते. ही नावे वारावरुन, महिन्यांवरुन आणि पुनर्जन्मावर विश्वास असल्यामुळे मृत पूर्वजांवरुनही ठेवली जातात. त्याच प्रमाणे निसर्गातील गोष्टींवरुनही मुलांची नावे ठेवली जातात. अलिकडच्या काळात गद्य संस्कृतीतील नावेही ठेवली जातात. शाळेत मुलांना प्रवेश घेताना मास्तरांना नावे अपरिचयाची असल्याने मुलांच्या नावात बदल झालेला दिसून येतो.

मुलगी वयात आल्यानंतर १४ ते १६ या वयोगटात तिचा विवाह करतात. मुलींना किंवा महिलांना

मासिक पाळी आली की, त्यांना वेगळया झोपडीत ठेवले जात होते. चार दिवस यांचा मुक्काम या झोपडीत असे. अलिकडे ही पध्दत कमी झाली आहे. परंतू घरात त्यांना चार दिवस कशालाही शिवू दिले जात नाही. मुलगी उपवर झाल्यानंतर तीला मुलांना स्वत:चा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असते. कांही वेळा ते पळून जाऊन विवाह करतात. गोंडांची या विवाहाला मान्यता असते. एखादी मुलगी जर आपल्याला आवडलेल्या मुलाच्या घरात रहायला गेली तर तीला ' घरघुशी ' म्हणतात. त्यानंतर मुलाच्या व मुलीच्या वडिलांचा एकमेकाशी संपर्क होऊन त्यांचा रितसर विवाह केला जातो. लग्नामध्ये मुलगा मुलीच्या वडिलांना विशिष्ट रक्कम, धान, बैल, बकरा इ. स्वरुपात हुंडा देतो. ज्याच्याजवळ हुंडा द्यायची ऐपत नाही तो मुलगा मुलीच्या घरी विशिष्ट दिवस काम करतो. अशा मुलाला ' ढगल्या ' म्हणतात. लग्न मुलीच्या घरी मांडवात होते. सालईच्या झाडाचा 'मुंड ' म्हणजे खांब मध्यभागी असतो. तो कोरीव असतो. लग्नात अंगाला हळद लावणे, डोक्यावर पाणी ओतणे, अंगठयाला अंगठा लावणे यासारखे विधी केले जातात. बहुपत्नी विवाह गोंडाना मान्य आहे. परंतू अलिकडे शासनाच्या कायद्यामुळे बहुधा एकच पत्नी ते करतात. गोंडामध्ये जात-पंचायत आजही प्रचलित आहे. घटस्फोट घ्यायचा असेल तर तो जात पंचायतीत मागतात.

माणूस मेल्यानंतर त्याला पुरण्याची प्रथा गोंड समाजात आहे. मृत माणसाला पुरल्यानंतर तिथे पाण्याचा माठ, खाट, कांही खाद्य , दारु इ. ठेवतात. परंतू श्रीमंत किंवा प्रसिध्द व्यक्तीच्या मृतदेहाला दहनही करतात. गोंडाचा आत्म्यावर व पुनर्जन्मावर विश्वास आहे. गोंड लोक बारा किंवा तेरा दिवस सुतक पाळतात. दहाव्या किंवा त्यांच्या सवडी नुसार श्राध्दविधी घालतात. यालाच ' करसड ' म्हणतात. त्यावेळी त्या मृतव्यक्तीच्या नावाचे स्मारक म्हणून दगडाचा ' उरस्कल ' कलबंडा उभारतात. वरील सर्व विधींना जेवण करतात व मोहाची दारु पिऊन नृत्य करतात. गावातील सर्व गोंडांचा यात समावेश असतो.

नृत्य :-

लिंगोनेच गोंडांना नृत्य व संगीत शिकविले अशी गोंडाची समजूत आहे. गोंडी नृत्य फारच वेगवान व धडाकेबाज असते. ढोल, कुंडुडि, चिटकोरा, पायात घुंगरु यासारखी वाद्ये वाजवून गोंड लोक सामुहिक नृत्य करतात. सण, सभारंभाची किंवा प्रसंगा नुसार गायली जातात कांही गीते परंपरेने चालत आली आहेत. त्यांचा समावेश नृत्य गायनात केला जातो. परस्परांच्या खांद्यावर हात ठेऊन मुले-मुली किंवा स्त्रीया, पुरुष उभे राहतात. प्रथम ढोलांचे संगीत सुरु होते. त्यानंतर पाय थिरकायला लागतात त्याचवेळी घुंगराचा आवाज यायला सुरुवात होते व नंतर गळयातून ते स्वर काढतात. त्यांच्या संगीतात चारच स्वर प्रामुख्याने आढळतात. ' सा - सा - नि - प ' यावरच त्यांचे परंपरागत संगीत असलेले दिसून येते.

एकूणच भारता मधील आदिवासी जमातीमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या जमातीपैकी एक महत्वाची आदिवासी गोंड जमात आहे. या जमातीची संस्कृती ही वेगळीच आहे. त्यांच्या मध्ये असणारी देवदैवते, त्यांना आळवण्यासाठी केलेला विधी, युवा पिढयांसाठी असलेले घोटुळ, व्यक्तीच्या जन्मापासून ते दहाव्या पर्यंत केलेले विधी, जमिनीच्या पेरणीपासून ते रास घरात येईपर्यंतचे विधी, नृत्य संगीत याविषयीची आवड हे सर्व त्यांच्या संस्कृतीचे द्योतकच आहे. परंतू बाहय समाजाच्या संस्कृतीचा त्यावर परिणाम होत असल्याने गोंडाची मुळ संस्कृती संकरीत झाली आहे. त्यामुळे मुळ संस्कृती जतन होणे गरजेचे आहे. आणि ते आज आव्हान आहे. आदिवासी मुले शिकू लागली परंतू त्यांना आपण आदिवासी आहोत असे म्हणून घेणे कमीपणाचे वाटू लागले, त्यामुळेच तेही आपली मुळची जमात विसरुन बाहय संस्कृतीचा पोशाख पांघरत आहेत. हे म्हणजे आईला सोडून मावशीला जवळ केल्यासारखेच आहे असे वाटते.

संदर्भ :-

१) रसेल आर. व्ही. आणि हिरालाल - ट्राईब्ज् ॲण्ड कास्टस् ऑफ सेंट्रल प्रोव्हीनसेज ऑफ इंडिया भाग - III - कॉस्मो पब्लिकेशन दिल्ली.
२) डॉ. एस. जी. देवगांवकर , डॉ. शैलजा देवगांवकर - गोंड, परधान आणि कोलाम - श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३) डॉ. आर. बी. सिंह - आदिवासींचा देव, कुँवारा - भिवसेन; लोकमत गुरुवार दि. १८/४/१९८५ नागपूर.
४) इरावती कर्वे - मराठी लोकांची संस्कृती - देशमुख आणि कंपनी, पुणे.